| MHKO110007432012 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३२३/२०१२ मधील</u>**<br>**<u>नि.क्र.३९ वरील आदेश</u>**<br>**श्री.संजय आण्णा परीट वि.**<br>**श्री.माणिक वसंत यादव वगैरे** |
|---|---|

प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज हा त्यांचेविरुध्द उलटतपास नाही असा झालेला आदेश रद्द होवून वादी यांचा उलटतपास घेणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुचा युक्तीवाद विचारात घेतला. सदर प्रतिवादी यांचे कथन असे की, सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द रक्कम वसुलीकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत कामी वादी यांचा उलटतपास घेणेस पूर्वीही तयार होते व आताही आहेत. यातील प्रतिवादी यांचे घरगुती अडचणीमुळे सदर कामी मागील नेमले तारखेस प्रतिवादी हे कोर्ट मजकूरी हजर नव्हते. तसेच त्यांचे वकीलसुध्दा मागील नेमले तारखेस दुस–या कोर्टाचे कामात व्यस्त असलेमुळे मे.कोर्टात हजर राहून उलटतपास घेऊ शकले नाहीत. सदरचा आदेश रदद झालेस प्रस्तुत वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सदर काम गुणदोषावर निकाली काढणेस मदत होणार आहे. प्रतिवादी यांना वादीचा उलटतपास घेणेस संधी मिळाली नाही तर प्रतिवादी यांचे अतोनात नुकसान होणार

आहे. त्याकरीता प्रस्तुत प्रतिवादी यांचेविरुध्द रोजी झालेला उलटतपास नाहीचा आदेश रदद होणेची विनंती केली आहे.

**३.** प्रस्तुत कामी वादी यांनी निशाणी ४० वर कलम १ ते ४ द्वारे त्यांचे म्हणणे दाखल केले असून सदरचा अर्ज खोटा व खोडसाळ असल्याचे कथन केले आहे. सदरचा अर्जात नमूद केलेले कारण हे योग्य व संयुक्तीक नाही. दाखवलेले कारण हे चुकीचे व मोघम स्वरुपाचे आहे. प्रतिवादी यांनी जाणीवपूर्वक व हेतुपुरससर अर्ज देणेस विलंब व कामात गैरहजर राहीलेले आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांचा सदरचा उलटतपास नाहीचा अर्ज मंजूर करणेचे झालेस रक्कम रुपये ५०००/– इतकी **कॉस्ट** प्रतिवादी यास करणेत यावी अशी विनंती केली आहे.

**४.** न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, निशाणी ३६ वर दिनांक १०/०१/२०२२ रोजी माझ्या पूर्वाधिकारी यांनी प्रतिवादींविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत केलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द रक्कम वसुलीकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रकरण हे गुणदोषावर चालून निकाली होणेकरिता प्रतिवादी यांचा उलटतपास होणे गरजेचे आहे. अर्जातील कारणे व प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता सकृतदर्शनी प्रतिवादी यांचा उलटतपास घेण्याची संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे. जर सदरचा अर्ज मंजूर केलेस वादी यांना कोणतेही नुकसान होणार नाही. उलट न्यायालयास प्रकरण गुणदोषावर निकाल करणेकरीता हातभार लागणार आहे. परंतू

प्रतिवादींच्या अर्जामुळे सदरचे प्रकरण पुन्हा वादीच्या उलटतपासासाठी लागणार आहे. सबब, या कारणास्तव प्रतिवादींवर खर्च ठेवणे संयुक्तीक वाटते . सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आ दे श –**

प्रस्तुतचा अर्ज (निशाणी ३९) रक्कम रुपये २०० /–(रुपये दोनशे फक्त ) वादी यांना देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

दि.१९/०९/२०२२ (एस. डी.शिरसाट )
पेठवडगांव २ रे दिवाणी न्यायाधीशसाो क. स्तर
पेठवडगाव